**प्रेसनोट** दिनांक १८/०४/२०१९

शिर्षक :- डॉ.अभिजीत शिवाजीराव पाटील, वय ३६ वर्षे, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग फलटण, फलटण शहर पोलीस स्टेशन गुन्हा गु.र.नं.१३६/२०१९ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (भ्रष्टाचार प्रतिबंध (दुरुस्ती) अधिनियम २०१८) कलम ७, १५, भारतीय दंड संकिता कलम ३६५, ३९२, ४२७, २०१ प्रमाणे दाखल झाले गुन्हयाबाबत…

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र,सातारा युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | फलटण शहर गु.र.नं.१३६/२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८(भ्रष्टाचार प्रतिबंध(दुरुस्ती) अधि नियम २०१८) कलम ७,१५ भारतीय दंड संकिता कलम ३६५,३९२,४२७,२०१ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | डॉ.अभिजीत शिवाजीराव पाटील, वय ३६ वर्षे, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग फलटण रा. शासकिय निवासस्थान फलटण, मुळ रा. प्लॉट नं. ६ स्वातंत्र सैनिक कॉलनी, राजेंद्रनगर कोल्हापुर, वर्ग १ पोलीस खाते |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,७५,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ००.००/- |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार राजकुमार एकनाथ चव्हाण यांनी दि.१८/०४/२०१९ रोजी लाच मागणी संदर्भात दिले लेखी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने दि.१८/०४/२०१९ रोजी केले पडताळणी, सापळापुर्व व सापळा स्थगित पंचनामा कारवाईवेळी घडलेल्या घटना व ध्वनिमुद्रीत संभाषण या वरुन लोकसेवक डॉ.अभिजीत शिवाजीराव पाटील,वय ३६ वर्षे, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग फलटण रा. शासकिय निवासस्थान फलटण, मुळ रा.प्लॉट नं. ६ स्वातंत्र सैनिक कॉलनी,राजेंद्रनगर कोल्हापुर, वर्ग १ पोलीस खाते यांनी खंडाळा पो.स्टे.गु.र.नं.२१/२०१९ भादंवि कलम४२०,३४ प्रमाणे दाखल गुन्हयातील मुळ फिर्यादी हे तक्रारदार यांचे पक्षकार असुन सदर गुन्हयामध्ये मुळ फिर्यादी यांना ८ लाख रुपयांचा डीडी तक्रारदार यांचे मार्फत मिळवुण देण्यासाठी लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे २,५०,०००/- रुपयांची लाच मागणी करुन त्यापैकी १,७५,०००/-रु लाच रक्कम दि.१८/०४/२०१९ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग फलटण कार्यालय येथे पडताळणी कारवाईवेळी तात्काळ स्विकारण्याची तयारी दर्शविली त्याअनुषंगाने आयोजीत सापळा कारवाईमध्ये लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांचेकडुन १,७५,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली नसुन तक्रारदार यांना जबरदस्तीने लोकसेवक पाटील यांनी त्यांचे शासकिय वाहनामध्ये बसवुन,पळवुन नेवुन,तक्रारदार यांचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅंडसेट किंमत ९,०००/-रु व तक्रारदार यांचेकडील शासकीय व्हाईस रेकॉर्डर व त्यामधील मेमरीकार्डसह किंमत ६,५००/-रु जबरदस्तीने तक्रारदार यांचेकडुन हिसकावुन घेवुन हाताने मारहाण करुन तक्रारदार यांचे मोबाईलचे मोडतोड करुन नुकसान केले आहे. शासकिय व्हाईस रेकॉर्डर व त्यातील मेमरीकार्डमध्ये पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान ध्वनिमुद्रीत झालेल्या लाचेच्या संदर्भातील संभाषण नष्ट करुन पुरावा नष्ट केलेला आहे म्हणुन त्याचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८(भ्रष्टाचार प्रतिबंध(दुरुस्ती)अधिनियम २०१८) कलम ७,१५भारतीय दंड संकिता कलम ३६५,३९२,४२७,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. |
| विशेष बाब | |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्ट्राचारासंबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.

संपर्क पत्ताः- पोलीस उपअधीक्षक,अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सिटी सर्व्हे नं.५२४,सदरबझार सातारा

संकेत स्थळः- acbmaharashtra.gov.in

ई-मेलः- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार अ‍ॅपः- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांकः- १०६४

दुरध्वनी क्रमांकः- ०२१६२-२३८१३९

व्हॉटसअ‍ॅप क्रमांक :-७८७५३३३३३३